संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे • • अंक : १२१ • • गुरूवार दि. २१ मार्च २०२४ • • किंमत २ रु • पाने : ४ • RNI : MAHMAR/2017/77021

## मी सुद्धा आरे ला कारे करू शकतो : अजित पवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मतदारसंघातील पारंपरिक विरोधकांनी अजित पवारांचं टेन्शन वाढवलंय. विजय शिवतारे यांनी तर इथून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा इशारा दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांना विजय शिवतारे यांच्या भूमिकेबाबत विचारणा केली असता त्यांनी सूचक विधान केलं आहे.

अजित पवार यांनी केलेल्या बंडामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर यावेळच्या लोकसभा निवडणुकीत बारामतीमध्ये सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार असा सामना रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. कुटुंबात पडलेल्या फुटीमुळे आमने-सामने आलेल्या पवार कुटुंबातील उमेदवारांमध्ये होणाऱ्या या लढतीकडे संपूर्ण राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलंय. मात्र या लढतीपूर्वी बारामती लोकसभा मतदारसंघातील अजित पवारांच्या पारंपरिक विरोधकांनी त्यांचं टेन्शन वाढवलंय. विजय शिवतारे यांनी तर इथून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा इशाला दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर



अजित पवार यांना विजय शिवतारे यांच्या भूमिकेबाबत विचारणा केली असता त्यांनी सूचक विधान केलं आहे.

अजित पवार हे आज प्रसारमाध्यमांशी संवाद साधत असताना विजय शिवतारे यांच्या बंडखोरीचा फटका बारामतीमध्ये बसेल का असा प्रश्न विचारला असता अजित पवार म्हणाले की, मला त्याबद्दल अजून काही माहिती नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवतारे यांना काही आवाहन केल्याचं मी वृत्तवाहिन्यांवर पाहिलं होतं. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचं ऐकायचं की नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. आम्हाला वातावरण खराब करायचं नाही आहे. आम्हीही आरेला कारे करू शकतो. मात्र मला महायुतीमधील वातावरण खराब न करता निवडणुकीला सामोरं जायचं आहे. कारण मी काही विधान केलं की त्याचा विपर्यास केला जातो, असे अजित पवार म्हणाले.

यावेळी काही सहकारी साथ सोडून शरद पवारांकडे जात असल्याबाबत विचारले असता अजित पवार म्हणाले की, कुणी कुणाची भेट घ्यावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. कुणी कुणाला बांधून ठेवू शकत नाही. ज्याला ज्याचे विचार पटतील तो त्याच्या पद्धतीने त्यांच्या भेटी घेऊ शकतो. जे आमच्या बरोबर येतील, त्यांना सोबत घेऊन पुढे जाऊ, असेही अजित पवार यांनी सांगितले.

## शिस्त पाळा, कारवाई टाळा

### म्हसवडचे नूतन एपीआय एस.आर.बिराजदार यांचे नागरिकांना आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : म्हसवड पोलीस स्टेशन ठाणे येथे एपीआय एस.आर.बिराजदार यांनी कायद्याचा वचक निर्माण केला आहे. बेकायदेशीर धंद्यावर धाडसत्र सुरू असून बेकायदेशीर व्यवसायावर कारवाईचा पवित्रा सुरूच असल्याने शिस्त पाळा, अन कारवाई टाळा असे आवाहन म्हसवड पोलीस ठाणेचे एपीआय एस.आर. बिराजदार यांनी नागरिकांना केले आहे.



एस.आर.बिराजदार

म्हसवड शहरात बेफामपणे दुचाकी चालकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. तसेच बेशिस्त दुचाकी पार्किंग करणाऱ्या वाहन चालकांना देखील सूचना करत त्यांना समज देण्यात आली आहे. रस्त्यावरील पांढऱ्या रेषेच्या बाहेर दुचाकी अथवा चार चाकी वाहने कुणीही लावून जाऊ, त्यामुळे मुख्य वाहतुकीला अडथळा ठरत असून इतर वाहनाना अडथळा होईल अशी कृती करू नये, असे आवाहन त्यांनी सर्वांनाच केले आहे. पोलीस कुणालाच जाणीवपूर्वक त्रास देणार नाहीत मात्र नागरिकांनी शिस्त पाळावी. शिस्त मोडून कोणी वागत असेल तर कारवाई होणारच असेही त्यांनी यावेळी ठामपणे संगितले.

## आवळाईचे सरपंच गजेंद्र पिसे यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील आवळाई गावाचे लोकनियुक्त सरपंच गजेंद्र पिसे यांचा 'आदर्श सरपंच' पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष वैभव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आवळाई ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये गजेंद्र पिसे यांच्या पॅनेलने सत्ताधाऱ्यांचा पराभव करत आवळाई ग्रामपंचायतीवर विजय मिळविला होता. तर स्वत: गजेंद्र पिसे हे लोकनियुक्त सरपंच म्हणून निवडून आले होते. निवडणुकीनंतर



**आटपाडी : आवळाई ग्रामपंचायत कार्यालयात येथे लोकनियुक्त सरपंच गजेंद्र पिसे यांचा सत्कार करताना वैभव पाटील व उपस्थित मान्यवर**

त्यांनी आवळाई ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या पिसेवाडी, आवळाई, शेरेवाडी गावच्या विकासामध्ये समतोल साधत अनेक कामे केली होती.

त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय 'आदर्श सरपंच' पुरस्कार मिळाला होता. या मिळालेल्या पुरस्काराबाबत त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष वैभव पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिघंची ग्रामपंचायतीचे मा. सदस्य बळीराम रणदिवे, युवा नेते जीवन मोरे, छगनशेठ साळुंखे, कानिफनाथ खंडागळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## तर मी विशाल पाटलांमागे उभा राहीन : पै. चंद्रहार पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सांगली लोकसभेसाठी महाविकास आघाडीचा अद्यापही उमेदवार ठरला नसून, जागे वाटप वून बराच गोंधळ सुरु आहे. त्यातच पै. चंद्रहार पाटील यांनी मला मातोश्रीवरून उमेदवारीचा शब्द देण्यात असल्याचे म्हणाले, असून जे महाविकास आघाडी कडून विशाल पाटील यांना उमेदवारी मिळाली तर मी शिवसैनिक म्हणून त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहीन. जर मला उमेदवारी मिळाली तर विशाल पाटील यांनी माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहून मला निवडून आणण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले.



विशाल पाटील    चंद्रहार पाटील

आज मिरजेत उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेची माहिती देण्यासाठी काल पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना चंद्रहार पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सभेमधून जे काय चित्र असेल ते स्पष्ट होईल मला उमेदवारी मिळेल, अशी आशा असल्याचे यावेळी चंद्रहार पाटील म्हणाले.

चंद्रहार पाटील यांनी मातोश्रीवर जाऊन शिवसेनेमध्ये प्रवेश केल्यानंतर उमेदवारीचा शब्द आल्याने काँग्रेसमध्ये सन्नाटा पसरला आहे. काँग्रेसने सांगली जागेवर दावा करतानाच जागा आपलीच असल्याचे म्हटलं आहे. कोल्हापूरची जागा ठाकरे गटाकडून काँग्रेससाठी सोडण्यात आल्यानंतर सांगलीच्या जागेवर ठाकरे गटाचा दावा आहे. ठाकरेंकडून उद्याच्या सभेत ठाकरे गटाकडून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाल्यास सांगलीची लढत चंद्रहार पाटील विरुद्ध भाजपचे संजय पाटील अशी होईल. संजय पाटील यांना भाजपकडून उमेदवारी घोषित करण्यात आली आहे.

## पांडुरंग कटरे यांची निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील घाणंद गावाचे माजी सरपंच पांडुरंग कटरे यांची ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे.



पांडुरंग कटरे

आटपाडी तालुक्यातील घाणंद गावाचे ते माजी सरपंच आहेत. त्यांची ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी निवड करण्यात आली असल्याचे पत्र ऑल इंडिया धनगर समाज महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रवीण काकडे यांनी दिले आहे.

धनगर समाजाचे संवर्धन आणि समाजहिताचे रक्षण व्हावे या हेतुने राष्ट्रीय पातळीवर पोटशाखा भेद, प्रांतभेद, भाषाभेद, बाजूला ठेऊन सर्व धनगर समाज एक होत आहे. या राष्ट्रीय प्रवाहात आपणास सहभागी करुन घेऊन आपल्या आजपर्यंतच्या समाज सेवेचा यथोचित गौरव करावा व आपणास आणखी विस्तारीत कार्यक्षेत्र उपलब्ध व्हावे. या हेतूने आम्ही आपली ऑल इंडिया धनगर समाज महासंघाच्या महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख पदी निवड करीत आहोत. सदरील पदावर उत्कृष्ट कार्य करुन आपण समाजाने आपल्यावर टाकलेल्या विश्वासास आणि आदरास तडा जाऊ देणार नाही, अशी अपेक्षा असे नियुक्ती पत्रात केली आहे.

## म्हसवड बस स्थानक परिसरातील पथदिवे सुरू करा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : म्हसवड बस स्थानक परिसरातील सातारा-पंढरपूर राज्य महामार्गावरील गेले अनेक वर्ष बंद असणारे विद्युत पथदिवे सुरू करण्याची मागणी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने म्हसवड नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे.

मूलभूत सुविधा व सुरक्षा लक्षात घेता विद्युत पथदिवे तातडीने सुरू करण्याची लेखी मागणी निवेदनाद्वारे महाराष्ट्र प्रदेश किसान काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रा.विश्वंभर बाबर, म्हसवड शहर काँग्रेसचे अध्यक्ष विकास गोंजारी, बाळासाहेब आटपाडकर, निलेश काटे, सागर सावंत, पंकज पोळ, प्रकाश कुलकर्णी यांनी म्हसवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांच्याकडे केली आहे.



**म्हसवड : म्हसवड येथील पथदिवे सुरू करणे कामी मुख्याधिकारी यांना देताना काँग्रेसचे पदाधिकारी**

म्हसवड बस स्थानकानजीक सातारा-पंढरपूर राज्य महामार्गावर वर्षांपूर्वी विद्युत पथदिवे बसवलेले होते. मात्र सदर यंत्रणा बसवल्यानंतर त्यातील बरेचसे पथदिवे बंद पडलेले आहेत. सदर ठिकाणचे पथदिवे कोणी सुरू करायचे, यावरून म्हसवड नगरपालिका व रस्ते विकास महामंडळ कार्यालय पुणे यांच्यात विसंवाद दिसून येत होता.

पथदिवे सुरू होणे कामी प्रा.विश्वंभर बाबर यांनी रस्ते विकास महामंडळ पुणे अधीक्षक अभियंता अश्विनी घोडके यांच्याकडे वरचेवर पाठपुरावा केलेला होता. स्थानिक रहिवासी सुविधा व वाहतूक सुरक्षा लक्षात घेता सदर काम होणे साठी काँग्रेस पदाधिकाऱ्यानी म्हसवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी सचिन माने यांची भेट घेऊन सदर काम मार्गी लावण्याची जबाबदारी नेमकी कोणाची? याबाबत विचारणा करत, अधीक्षक अभियंता यांच्याशी फोनवरून संपर्क साधला असता सदर काम तातडीने मार्गी लावण्याची ग्वाही अधीक्षक अभियंता अश्विनी घोडके यांनी दिली.

## दराबाबत फेर पडताळणी करू : डॉ.राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा निवडणुकीत राजकीय पक्षांना प्रचाराच्या अनुषंगाने विविध साहित्याची आवश्यकता पडते. या साहित्याचे दर योग्य आहेत का नाहीत याबाबत फेर पडताळणी करून दोन दिवसात दरपत्रक अंतिम करू, असे आश्वासन जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले.



डॉ.राजा दयानिधी

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची खर्च नियंत्रणाच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. ते पुढे म्हणाले, बल्क एसएमएस बाबत दराची पडताळणी करू, त्यांना योग्य दर लावण्याबाबत सुचित करू असे ही त्यांनी सांगितले. छोट्या चारचाकी वाहनांचे दर प्रशासनाने कमी करावेत त्याचबरोबर मांडवाच्या दराची आकारणी दर दोन तासानुसार व्हावी अशी अपेक्षा राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींनी यावेळी व्यक्त केली.

राजकीय पक्षाच्या अडचणीबाबत दर मंगळवारी बैठक घेणार असल्याचेही जिल्हाधिकारी यांनी यावेळी सांगितले. या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी डॉ.स्नेहल कनिचे, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी विठ्ठल चव्हाण यांच्यासह विविध पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## स्वेरीमधील शैक्षणीक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो

### विजय पाटील : स्वेरीत 'मेकॅनिकल इंजिनिअरिंग' विभागाचा पालक मेळावा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पंढरपुर : 'सोलापूर जिल्ह्यात स्वेरी मधून मिळणारे तंत्रशिक्षण हे वेगळे, शिस्तबद्ध आणि पालक या भुमिकेतून पाहिल्यास महत्वाचे वाटते. विविध शैक्षणिक उपक्रमांमुळे आमच्या पाल्यामध्ये असणारे सुप्त गुण जागृत होतात. त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यामुळे साहजिकच आमचे पाल्य भविष्याच्या दृष्टीने करिअर करण्यासाठी सज्ज होऊ लागतात. या कारणांमुळे आम्ही पालक वर्ग आमच्या पाल्याबाबत निश्चिंत असतो. अभ्यासाबाबत स्वेरीतील प्राध्यापकांकडून सातत्याने जो पाठपुरावा होत असतो तो खरोखरच कौतुकास्पद आहे. यामुळे आमच्या पाल्याचा शैक्षणिक व व्यक्तिमत्व विकास होतो. एकूणच स्वेरीत नियमित चालणाऱ्या शैक्षणिक उपक्रमामुळे आमच्या पाल्यांचा आत्मविश्वास वाढतो.' असे प्रतिपादन सोलापूर येथील किर्लोस्कर कंपनीचे सहाय्यक व्यवस्थापक विजय पाटील यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातर्फे 'पालक मेळावा' आयोजित केला होता. याप्रसंगी पालक प्रतिनिधी म्हणून किर्लोस्कर कंपनीचे सहाय्यक



**पंढरपूर : स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात पालक मेळावा संपन्न झाला याप्रसंगी उपस्थित मान्यवर तर पालक मेळाव्यासाठी उपस्थित पालक वर्ग**

व्यवस्थापक विजय पाटील उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. यावेळी महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ.कल्पना विजापुरे ह्या उपस्थित होत्या. दीपप्रज्वलनानंतर विभागप्रमुख डॉ.एस. बी. भोसले यांनी पालकांशी संवाद साधताना म्हणाले की, 'विद्यार्थ्यांनी इंजिनिअरिंग पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या मागे न लागता उद्योग व्यवसायात करिअर करावे. आपण स्वतः नोकरी मिळविण्यापेक्षा इतरांना नोकरी कशी देता येईल याकडे लक्ष द्यावे. यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना प्रोत्साहीत करावे.' असे सांगून विभागामध्ये घेतले जाणारे विविध शैक्षणिक उपक्रम, महाविद्यालयाला मिळालेली मानांकने व त्यांचे महत्व, पेटंटस, वर्षाचा नियोजित केलेला अभ्यासक्रम व मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा आढावा याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यावेळी गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्लेसमेंट विभागाचे प्रा.अविनाश मोटे पालकांशी सुसंवाद साधताना अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या गेट परीक्षेबाबत मार्गदर्शन केले तसेच स्वेरी कॉलेजमध्ये येणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कंपन्यांबद्दल आणि प्लेसमेंट विभागाच्या कार्याबाबत माहिती दिली. यावेळी पांडुरंग आसबे यांच्यासह काही पालकांनी आपले विचार मांडले. यावेळी कृष्णदेव नागनाथ ढेकळे यांनी आपले पाल्य एका चांगल्या कंपनीत नोकरीला लागल्यामुळे आनंदी होऊन त्यांनी विभागप्रमुख डॉ. भोसले यांचा विशेष सत्कार केला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेला हा पालक मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रा.डी. टी. काशीद, प्रा.पी. बी. आसबे, प्रा.ए.के.पारखे यांच्यासह इतर प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

यावेळी जिल्ह्यातील जवळपास २०० पालक, तसेच स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रशासन अधिष्ठाता डॉ.आर.आर.गिड्डे, संशोधन अधिष्ठाता डॉ.ए.पी.केने, डॉ. हर्षवर्धन रोंगे यांच्यासह विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. पालक मेळाव्याचे सूत्रसंचालन प्रा. एस. वाय. साळुंखे यांनी केले तर इंटर्नल क्वालिटी अशुरन्स सेलचे समन्वयक डॉ. एस. एस. वांगीकर यांनी आभार मानले.

*** संपादकीय ***

# ‘मी’ मज हरपून..

समोर विरोधक नावालाही नसलेल्या निवडणुकीत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे ८७ टक्के मते पडून ‘विजयी’ झाले. पुढील काळात उरलेल्या १३ टक्क्यांची मते का मिळाली नाहीत आणि मुख्य म्हणजे ते १३ टक्के कोण याचा शोध घेण्याचा प्रयत्न पुतिन करणारच नाहीत, असे नाही. गेल्या पाच निवडणुकांत ते अशाच मताधिक्याने निवडून आले. त्या निवडणुकांत त्यांचे जे काही विरोधक होते ते नंतरच्या निवडणुकांत दिसेनासे होत गेले. एक सरळ क्रेमलिनसमोर गोळ्या घालून मारला गेला तर दुसरा तुरुंगात अचानक कोसळला. आणखी कोणी लंडनच्या उद्यानात विषबाधेने गेले तर कोणाचा मृतदेह परदेशातील त्याच्या निवासस्थानाच्या न्हाणीघरात आढळला. अर्थात यातील कोणाही हत्येचे मारेकरी कधीही सापडले नाहीत आणि त्यांचा शोध घेण्याची, त्यांस शासन केले जावे याची गरज बहुतांश सामान्य रशियनांस वाटली नाही. या सामान्य रशियनांचा पुतिन यांच्यावर विश्वास आहे. ते आपल्या देशास पुन्हा गतवैभव आणून देतील यावर या नागरिकांची श्रद्धा आहे. असे हजारो, लाखो नागरिक पुतिन यांच्या या निवडणूक विजयाने भारावून जात क्रेमलिनसमोर गर्दी करते झाले. आपल्या चाहत्यांचे हे प्रेम पाहून त्यामुळे पुतिनही भारावून गेले आणि मग त्यांनी उपस्थितांस रशिया जर पुन्हा कधी महान होणारच असेल तर ते फक्त मीच कसे करू शकतो यावर मार्गदर्शन केले.

गेली २४ वर्षे हे असेच सुरू आहे आणि पुतिन यांच्या प्राणात प्राण आहेत तोपर्यंत हे असेच सुरू राहील. कारण आपणास रशियाच्या अध्यक्षपदी तहहयात राहता यावे अशी घटनादुरुस्ती पुतिन यांनी स्वहस्तेच करून घेतली असून त्यामुळे त्यांना आव्हान निर्माण होण्याची सुतराम शक्यता नाही. जे आव्हान देतात त्यांचे काय होते हे अलेक्सी नावाल्नी यांचे अलीकडे काय झाले यावरून दिसते. त्यामुळे सामान्य रशियनांतून कोणी पुतिन आव्हानवीर निर्माण होणे अवघड. पुतिन आज ७१ वर्षांचे आहेत आणि त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. त्यामुळे ‘त्या’ आघाडीवरही काही विशेष घडण्याची आशा रशियनांस नसावी. तेव्हा जे काही रशियात सुरू आहे त्यावरून या अशा सामान्यांबाबत काही प्रश्न जरूर पडतात. पुतिन यांच्या या दणदणीत विजयामुळे यातील काही प्रश्नांस भिडणे समयोचित ठरेल.

या प्रश्नांतील मुख्य मुद्दा म्हणजे लोकशाही. रोजचे जगणे हेच आव्हान वाटणाऱ्या सामान्यांच्या मनांत आपल्या देशात लोकशाही आहे की हुकूमशाही असे काही प्रश्न उमटतात काय? परिस्थितीस सामोरे जाताना, समोरची आव्हाने पेलताना कोणाच्या आई-माईंचा उद्धार करणाऱ्या दोन-पाच शिव्या देणे हीच आणि इतपतच ज्यांची अभिव्यक्ती असू शकते त्यांच्यासाठी अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा अधिक व्यापक अर्थ तितका महत्त्वाचा असतो काय? वास्तविक रशिया ही साम्यवादाची गंगोत्री. रशियन राज्यक्रांतीप्रसंगी लेनिनने घालून दिलेल्या वैचारिक मार्गाने अनेक देशांनी पुढे प्रवास केला. पण नव्वदच्या दशकात रशियातच या साम्यवादाचा पराभव होत गेला आणि तत्कालीन रशियन अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी स्वहस्ते स्वदेशाचे विघटन होऊ दिले. तोपर्यंतचा रशिया हा अक्राळ-विक्राळ, प्रचंड होता आणि अर्थव्यवस्था मोठी नसेल, त्याचा भव्य आकार हा अचंबित करणारा मुद्दा होता. गोर्बाचेव्ह यांच्या लोकशाही-प्रेमाने आपला घात झाला असे नंतरच्या बोरिस येल्तसिन यांनी थेट म्हटले नसले तरी त्यांचे उत्तराधिकारी पुतिन हे तसे बोलून दाखवू लागले. सामान्यांस आपल्या कथित गतवैभवाचे नेहमीच आकर्षण राहिलेले आहे. त्यामुळे; ‘‘पूर्वी आपण महान होतो, पण अमुक-तमुकने आपली वाताहत केली. मला संधी द्या, मी पुन्हा आपल्या देशास त्या महानपदी नेतो’’, असे सांगणारा नेता अनेकांस नेहमीच आकर्षून घेतो. अशा देशांत प्रत्यक्ष प्रगती मोजमापाच्या कोणत्याच यंत्रणा नसल्याने आणि त्या मोजमापाबाबत प्रश्न विचारणारी माध्यमेही सत्ताशरण झाल्याने कसलेच वास्तव समोर येत नाही. अशा विरोधशून्य, प्रश्नशून्य वातावरणात पुतिन यांच्यासारख्यांचा उदय होतो आणि त्यांचा अस्त कसा असेल याचा विचारही करता येत नाही. त्यात आपल्या साम्यवादी देशात पुतिन हे चर्चच्या धर्मसंस्थेला उघड पाठिंबा देतात आणि प्रसंगी चर्चमध्येही जातात. त्यामुळे आपला अध्यक्ष आपल्यासारखाच आहे हे सामान्यांच्या मनावर सहज बिंबते आणि पुतिन यांच्यासारख्यांचा खुंटा न हलवताच बळकट होत जातो. धर्मसत्ता ही राजसत्तेच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंब्याशिवाय फोफावू शकत नाही. पोप हेच जेव्हा रोमचे राजे होते तेव्हा ख्रिश्चन धर्माचा प्रसार अधिक झाला आणि सौदी संस्थापक महंमद बिन इब्न सौद यास पाठिंबा देण्याच्या शर्तीवर त्याने महंमद वहाब याच्या धर्मसत्तेस मदत केल्याने त्या परिसरात वहाब-पंथाचा विस्तार झाला. या अशा धर्मसत्ता-राजसत्ता साटेलोट्याचे अनेक दाखले आढळतील. सद्या:स्थितीत रशियातील चर्चच्या ‘सर्व गरजा’ पुतिन सुयोग्यपणे भागवत असल्यामुळे त्यांच्या राजवटीस धर्मसत्तेचा उघड पाठिंबा आहे. आणि जेव्हा सामान्यजन ज्यांच्यासमोर पापक्षालनासाठी, दैवी साहाय्यासाठी नतमस्तक होतात ती धर्मसत्ता हीच सत्ताधीशास पाठिंबा देताना दिसते तेव्हा सत्ताधीशांची सत्ता अधिक खोलवर रुजते. वास्तविक हे सर्व परस्पर-हितसंबंध रक्षण आहे, हे कळण्याइतकी समज सामान्यांस नसते. ही अशी सर्व समीकरणे जेव्हा जुळून येतात तेव्हा हुकूमशहाचा उदय होतो आणि त्याची सत्ता अबाधिताकडे वाटचाल करू लागते.

रशियात पुतिन यांचे असे झाले आहे. त्यामुळे त्यांचे परत अध्यक्षपदी येणे हा मुद्दा सध्याच्या निवडणुकीत रशियनेतरांसाठी कधीच महत्त्वाचा नव्हता. त्यांच्या मते खरा प्रश्न म्हणजे पुतिन पुन्हा अध्यक्षपदी येऊन नक्की करणार काय? बहुतांश रशियन अभ्यासकांत या प्रश्नाच्या उत्तरात एकमत दिसते. ते म्हणजे ‘‘गेली २४ वर्षे त्यांनी जे केले तेच पुढील सहा वर्षे ते करणार’’. याचे कारण त्याखेरीज अन्य काही ते करू शकत नाहीत. तसा प्रयत्न जरी त्यांनी केला तरी लोकांस लोकशाहीचे स्मरण होईल आणि मग त्यांची तुलना गोर्बाचेव्ह यांच्याशी होऊ लागेल. ते पुतिन यांस परवडणारे नाही. सर्व लोकशाही व्यवस्थांस भेडसावणाऱ्या समस्या जवळपास सारख्याच असतात. म्हणून त्यामुळे लोकशाहीस तिलांजली देणारे अनेकांस आवडू लागतात. म्हणजे तिकडे अमेरिकेत पुन्हा अध्यक्षपदी येऊ पाहणारे डोनाल्ड ट्रम्प. ‘‘मी निवडून आलो नाही तर अमेरिकेत रक्तपात होईल’’, असे ते उघड म्हणतात आणि ‘‘मला सत्ता मिळाल्याखेरीज रशिया पुन्हा गतवैभव मिळवू शकणार नाही’’, असे पुतिन म्हणतात. यातील साम्य हा योगायोग नाही. पुतिन यांनी पुन्हा अध्यक्षपदी निवडून आल्यावर केलेले भाषण हे सत्य अधोरेखित करेल. ‘आपण क्रायमिआबाबत केलेली कृती योग्यच’, ‘युक्रेनवर हल्ला तर करायलाच हवा’, ‘तो तर आपलाच भाग’, ‘आपल्याच देशाचे विघटन आपण कसे काय सहन करणार’, ‘मी ते होऊ देणार नाही’, ‘मला कोणा पाश्चात्त्य ताकदीने विरोध केला तर तिसरे महायुद्ध होईल’ इत्यादी इत्यादी त्यांची विधाने रशियाच्या उद्धारासाठी आपणाखेरीज तुम्हा पामरांस कसा पर्याय नाही, हे सामान्य रशियनांना सांगतात. म्हणूनच पुन्हा एकदा अध्यक्षपदी निवड झाल्यावर पुतिन हेच सांगत राहतील. त्यांना तेच सांगत राहावे लागेल आणि माझ्याशिवाय तुम्हास तरणोपाय नाही, हेच बिंबवत राहावे लागेल. समोर विरोधक आणि प्रश्न विचारणारी माध्यमे दोन्ही नसल्याने त्यांच्या या कार्यात अजिबात अडथळा येणार नाही.

# ‘सब का विकास’ची यांना एवढी भीती का वाटतेय?




फार नाही, पाचाच वर्षांपूर्वीची गोष्ट ५ ऑगस्ट २०१९ला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला तेव्हा हेच लोक सरकारचं गुणगान गात होते. आमची ७५ वर्षांपासूनची मागणी पूर्ण झाली म्हणून खुश होते आणि आज तेच नोकऱ्या नकोत पण विकास आवरा, अशी अव्यवहार्य मागणी घेऊन रस्त्यावर उतरले आहेत, उपोषण करताहेत. हा हिवाळा शेवटचा, तो सरला की आपल्याला कोणी विचारणार नाही, त्यामुळे आताच काय ते करावं लागेल, अशा हातघाईवर आले आहेत. आपल्या जल, जंगल, जमिनीवर अतिक्रमण होईल, असं त्यांना का वाटतंय? लडाखच्या रहिवाशांना झालंय तरी काय? त्यांचा सरकारवरचा विश्वास का उडाला आहे?

त्याचं झालं असं, की लडाख केंद्रशासित झाला याचा आनंद होत असतानाच तिथल्या रहिवाशांना एक चिंताही होती. एवढा काळ अनुच्छेद ३७०चं संरक्षण असल्यामुळे तिथल्या जमिनी स्थानिकांव्यातिरिक्त कोणी खरेदी करू शकत नव्हतं. आता केंद्रशासित झाल्यामुळे कोणीही येऊन जागा खरेदी करेल, उद्योग उभारेल, खाणकाम करेल आणि इथल्या संवेदनशील पर्यावरणाची हानी होईल, ही ती भीती. त्यामुळे अशा संवेदनशील आणि काही विशिष्ट जमातींची लोकसंख्या अधिक असणाऱ्या प्रदेशांना विशेष दर्जा देणाऱ्या सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश करण्यात यावा, अशी तिथल्या रहिवाशांची मागणी होती. या परिशिष्टात समाविष्ट भागांना स्वायत्त प्राधिकरण स्थापन करण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्या प्रदेशातल्या स्थावर मालमत्ता खरेदी विक्रीवर या प्राधिकरणाचं नियंत्रण असतं. भाजप सरकारने ही सहाव्या अनुच्छेदासंदर्भातली मागणी मान्य केली होती. त्यामुळे लडाखवसिय निश्चिंत होते. लोकसभा आणि स्थानिक हिल कौन्सिलच्या निवडणुकांत भाजपच्या जाहीरनाम्यात हा मुद्दा पहिल्या तीन आश्वासनांपैकी एक होता, पण निवडणुका झाल्या आणि आता पुढच्या निवडणुका आल्या तरीही लडाखचा समावेश सहाव्या परिशिष्टात करण्यात आलेला नाही

असं असलं तरीही, आपल्या जमिनी उद्योजकांना देता याव्यात म्हणूनच सरकार सहाव्या परिशिष्टात लडाखचा समावेश कारणं टाळतंय, असं लडाखवसियांना का वाटत असेल? २०१४ ते २४ या मोदी सरकारच्या १० वर्षांच्या कर्यकाळत असं काय घडलं, ज्यामुळे सरकारची प्रतिमा केवळ उद्योजकांना महत्त्व देणारं आणि त्यासाठी पर्यावरणाचं नुकसान करण्यास मागेपुढे न पाहणारं सरकार अशी झाली असेल?

पर्यावरण निर्देशांकात २०१४ साली भारत १८० देशांत १५५ व्या स्थानी होता. पण २०१९ पर्यंत हे स्थान घसरून १७७ वरं आलं आणि भारत पर्यावरणाच्या निकषांवर शेवटून चौथ्या स्थानी जाऊन पोहोचला. २०२२ मध्ये तर भारत सर्वांत शेवटच्या १८० व्या स्थानी होता. पंतप्रधान तर नेहमी पर्यावरण रक्षणासाठीची आपली कटीबद्धता ठामपणे मांडतात, प्रत्येक अर्थसंकल्पागणिक पर्यावरण, वनं, वन्यप्राणी, प्रदूषण निर्मूलन, स्वच्छ ऊर्जा वगैरेसाठी नवनव्या योजना जाहीर केल्या जातात, तरीही अशी घसरण का झाली असावी? या आकर्षक योजनांचं पुढे काय होतं, पर्यावरण रक्षणासाठी पूर्वीपासून कार्यरत असलेल्या सरकारी संस्थांची आजची स्थिती काय आहे, पर्यावरणविषयक कायद्याचं किती काटेकोर पालन होत आहे, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल

मे २०१४ मध्ये केंद्रात भाजपचं सरकार स्थापन झालं आणि नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली त्यानंतर अवघ्या तीन महिन्यांत ऑगस्ट २०१४ मध्ये नॅशनल बोर्ड फॉर वाइल्ड लाईफमधल्या सदस्यांची संख्या १५ वरून ३ सदस्यांवर आणण्यात आली. देशातल्या पर्यावरणविषयक वादांचा निपटारा योग्य रीतीने आणि वेगाने व्हावा यासाठी २०११ मध्ये राष्ट्रीय हरित लवादाची स्थापना करण्यात आली. मात्र त्यावर नियमानुसार तज्ज्ञांच्या नियुक्त्या न केल्या जाणं, सुनावण्याच न होणं, महत्त्वाच्या खटल्यांच्या सुनावण्या वर्षानुवर्ष सुरू राहणं अशी वृत्त वरचेवर येतात.

२०१५ मध्ये कॅगने सादर केलेल्या अहवालनुसार गुजरातमध्ये वन जमिनीचं चुकीच्या प्रकारे वर्गीकरण करण्यात आल्यामुळे अदानी समूहाच्या कंपनीला तब्बल ५८ कोटी रुपयांचा फायदा झाला. या संदर्भात इंडियन एक्स्प्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार वर्ग २ मध्ये समाविष्ट वन जमिनीसाठी प्रती हेक्टर ७.३० लाख आणि वर्ग ४ मधल्या वन जमिनिंसाठी प्रती हेक्टर ४.३८ लाख रुपये आकारले जात. मुंद्रा इथली एक हजार ८४० हेक्टर आणि ध्रुबमधली १६८ हेक्टर जमीन अदानी समूहाला विकण्यात आली होती. या दोन्ही जमिनींवरच्या वनांची घनता वर्ग २ मध्ये मोडेल एवढी होती, मात्र तरीही त्या वर्ग ४ मध्ये समाविष्ट करण्यात आल्या. परिणामी या व्यवहारात अदानी केमिकल्स लिमिटेडचा ५८ कोटी ६४ लाख रुपयांचा फायदा झाल्याचं कॅगच्या अहवालात म्हटलं होतं. या दोन्ही जमिनींत भारतीचं पाणी शिरत असे. तिथे मोठ्या प्रमाणात खारफुटी होती, त्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने या जमिनी अत्यंत संवेदनशील होत्या. हे सारं झालं तेव्हा नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री होते

देशातून नामशेष झालेल्या चित्त्यांना पुन्हा भारतात आणणं हा सुद्धा मोदी सरकारचा नमामि गांगे एवढाच चर्चा झालेला आकर्षक प्रकल्प. २०२२-२३ दरम्यान नामिबिया आणि दक्षिण आफ्रिकेतून २० चित्ते भारतात आणण्यात आले, मात्र त्यापैकी तब्बल सात प्रौढ चित्त्यांचा आणि तीन बछड्यांचा मृत्यू झाला.

हिमालयातल्या तीर्थक्षेत्रांच्या विकासबद्दल मात्र सरकार अतिशय आग्रही असल्याचं दिसतं. सिल्कियारा बोगद्यातली दुर्घटना संपूर्ण देशाने टीव्हीवर पाहिली. हा बोगदा चारधाम परियोजनेचा एक भाग होता. २०१६ साली पंतप्रधानांनी या परियोजनेचं भूमिपूजन केलं तेव्हा, अनेक पर्यावरणप्रेमींनी योजनेला विरोध केला होता. केदारनाथमध्ये २०१३ साली ढगफुटीनंतर झालेल्या भयंकर दुर्घटनेचा दाखला देण्यात आला होता. तरीही हिमालयासारख्या पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील पर्वताच्या क्षेत्रात ८२५ किलोमीटर लांबीचा महामार्ग बांधण्याचा हट्ट कायम ठेवण्यात आला.

भाजप सरकारने वायूप्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी २०१९मध्ये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम हाती घेतला होता. त्याअंतर्गत १३१ शहरांतल्या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार होत्या. मात्र सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटने प्रसिद्ध केलेल्या एका अहवालानुसार १३१पैकी केवळ ६९ शहरांत खऱ्या अर्थाने हवेच्या दर्जाचं परीक्षण केलं जाऊ लागलं. पैकी १४ शहरांतल्या धुलिकणांत १० टक्के घट झाली. तर १६ शहरांतल्या प्रदूषणात भरच पडली.

२०१४च्या जाहीरनाम्यात नदी जोड प्रकल्प राबविण्याचं आश्वासन देण्यात आलं होतं. त्यात ३० नदीजोड प्रकल्पांचा समावेश होता. त्यापैकी केवळ एकाच केन- बेतवा नदीजोड प्रकल्पाचं काम सुरू झालं आहे. या प्रकल्पात नऊ हजार हेक्टर जमीन, मध्य प्रदेशातल्या पन्ना अभयारण्याच्या व्याघ्र प्रकल्पाचा काही भाग आणि गिधाडांचा अधिवास पाण्याखाली जाणार आहे.

याच २०१४च्या जाहीरनाम्यात भाजपने देशातल्या वनक्षेत्राचं जतन करण्यात येईल, असं आश्वासन दिलं होतं. २०१९च्या जाहीरनाम्यात वन क्षेत्रात नऊ हजार चौरस किलोमीटरची भर पडल्याचं जाहीर करण्यात आलं. पुढे सरकारीने सदर केलेल्या अहवालात २०१५ ते २०२२ या कालावधीत वन क्षेत्रात १२ हजार २९४ चौरस किलोमीटरची भर पडल्याचं नमूद केलं होतं. २००५-२०१३ दरम्यान हाच आकडा अवघा सहा हजार ९६६ चौरस किलोमीटर होता, असं सांगत आपल्या काळात भरीव कामगिरी झाल्याचा दावा करण्यात आला, मात्र रिमोट सेन्सिंग डेटातून हाती आलेली माहिती त्याच्याशी विसंगत असल्याचं आढळलं. कॉफी आणि रबरची शेतंही वन्यजमीन म्हणून वर्गिकृत करण्यात आल्याचं त्यातून स्पष्ट झालं

जैव विविधता (सुधारणा) विधेयक २०२१ आणि वन संवर्धन (सुधारणा) विधेयक २०२३ संसदेच्या दोन्ही सभागृहांत ज्या पद्धतीने संमत करण्यात आलं त्यावर माजी पर्यावरण मंत्री जयराम रमेश यांनी टीका केली होती. यातलं पहिलं विधेयक संयुक्त संसदीय समितीने केलेल्या २० पैकी १९ सूचना धाब्यावर बसवून संमत करण्यात आलं आणि दुसऱ्या विधेयकासंदर्भात नेमण्यात आलेल्या संयुक्त संसदीय समितीत भाजपच्या खासदारांचाच भरणा होता, अशी नाराजी त्यांनी व्यक्त केली होती.

हे सारं पाहता जागतलं सर्वाधिक उंचीवरचं वाळवंट असणाऱ्या, पाण्यासाठी हिमनद्यांवर अवलंबून असलेल्या, पर्यटनावर गुजराण करणाऱ्या, आजही आपले जलाशय निवळशंखं राखण्यात यशस्वी ठरलेल्या, अनेक दुर्मिळ प्रजाती जतन करून ठेवणाऱ्या आणि मुख्य म्हणजे हिमालयासारख्या अस्थिर पर्वतात वसलेल्या लडाखला आपल्या जमिनीची, हवा-पाण्याची काळजी वाटणं स्वाभाविक नव्हे का? म्हणूनच सोनम वांगचुक म्हणतायत की आम्हाला काश्मीरपासून वेगळं करून स्वतंत्र ओळख मिळवून दिली हे छानच केलंत, पण आश्वासन देऊनही सहाव्या परिशिष्टात समावेश न करणं ही शुद्ध फसवणूक आहे. एरवी क्वचितच बातम्यांत येणारा हा शांत सुंदर परिसर पेटून उठला आहे तो आपल्या भागातली दुर्मिळ शांतता जपण्यासाठी. नोकरी वगैरे नंतर आधी आम्हाला आमची जमीन जपायची आहे, यावर ते ठाम आहेत. विकासच्या झगमगाटला भुललो तर हातचंही गमावून बसू याची जाणीव त्यांना आहे. आपल्याकडे जे आहे त्याची किंमत काही कोटींच्या गुंतवणुकीपेक्षा कित्येक पट अधिक आहे, याचा नम्र अभिमानही आहे

# उमेदवारांचे भवितव्य घडविण्याची ताकद बुथ अध्यक्षामध्ये:उदयनराजे भोसले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

वाई: देशातील गोरगरिबांच्या प्रापंचिक जिवनांत परिवर्तन घडवून आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध प्रकारच्या योजना तयार करुन त्या तळागाळातील लोकांपर्यत पोहचविण्याचे योग्य नियोजन केल्यानेच दिवसें दिवस भाजप या पक्षाची ताकत वाढताना दिसत आहे.हा पक्ष विचारवंतांचा आहे. देशाला प्रगतीच्या दिशेने नेहण्यासाठीची पावल नरेंद्र मोदी हे टाकताना संपूर्ण महाराष्ट्रासह देशातील जनता पाहत आहे. असे उद्गार खा.श्री.छ.उदयराजे भोसले यांनी काढले.

उदयनराजे पुढे म्हणाले लढायला जात असताना त्या पायावर चालत नाहीत तर पोटावर चालते त्याच प्रमाणे पक्ष सांगतो निवडणूकांची लढाई ही बुथ अध्यक्षांच्या जोरावर चालते .५०ते ६० वर्षा पुर्वी भाजपचे अटलबिहारी वाजपेयी आणी लालकृष्ण अडवानी हे दोनच खासदार निवडुन आले होते .त्या वेळी त्यांची विरोधकांनी फारमोठी कोंडी केली होती. तेव्हाची आणी आजची परिस्थिती पाहिली तर भाजप हा देशातील बलाढ्य पक्ष बनला आहे. हा पक्ष विचारवंतांचा पक्ष आहे .हा पक्ष बलाढ्य बनविण्या साठी तुम्ही सर्वजण कारणीभूत आहात. या पक्षाच्या सर्वच कार्यकत्यांनी पडत्या



काळात खुप यातना सहन केल्या आहेत.मोदींच्या नेतृत्वा खाली काम करताना समाधान वाटते. आजचे विरोधक छत्रपती शिवाजी महारांजे नाव घेवुन मते मागत असतात पण त्यांचे विचार आचरणात आणत नाहीत. पण त्याचे नाव घेवुन त्यांचे विचार आचरणात आनूण भाजप काम करीत आहे.पुर्वी या मतदार संघात २५ हजार मतदार होते पण मदनदादा भोसले यांनी हि मते १ लाखा पर्यंत पोहचली आहेत.

मदन दादा भोसले यांनी किसनवीर कारखाना हातात घेतल्या नंतर त्या ठिकाणी रात्रीचा दिवस करुन कारखाना सुस्थितीत आणला .हे करत असताना कार्यक्षेत्रातील गावांन बरोबर कार्यकत्यांचा संपर्क कमी झाला .त्यांचे कार्य मी जवळून पाहिले आहे .सहकारात काय चालते आणी काय चालत नाही हेही मी जवळून पाहिले आहे .सहकारातील विचार सोबत घेऊन यातून शेतकर्यांची प्रगती कशी होईल हे मदन भोसले सतत विचार करायचे त्यांच्या कुटुंबातील तरुण हा देशाचा कणा आहे .राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा बँक असते या बँकेने जिल्ह्यातील सहकारी संस्थांना आर्थिक मदतीचा हात देवून सहकाराचे जाळे जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करायचे असतात पण दुर्दैवाने किसन कारखाना मदनदादा भोसले यांच्या कडे असताना त्यांना जिल्हा बँकेने व्यक्ती द्वेषा पोटी आर्थीक मदत केली नाही. माझा स्वभाव हा परखड आहे जे मी बोलतो ते मी करतो. ज्या मतदारांच्या जिवावर आपण निवडुन येतो त्यांच्या विश्वासाला तडा जाता कामा नये याची मी काळजी घेत असतो. उदयनराजे भोसले यांनी वाई येथे आयोजित बुथ अध्यक्ष मेळाव्यात बोलताना दिली .या वेळी मदन दादा भोसले सुरभीताई भोसले यांची भाषणे झाली .या वेळी वाई विधान सभा मतदार संघासह जिल्ह्यातील भाजपाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणी बुथ अध्यक्ष ऊपस्थित होते.

# रास्तभाव धान्य दुकानदार संघटनेची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे धाव

## जिल्ह्यातील रास्तभाव दुकानदारांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मल्हारपेठ: धान्य वाटप करतानाच्या नेटवर्कच्या समस्या, शासनाकडून प्राप्त झालेली साडी वाटप व रिकामी पिशवी वाटप या वाटपामागे प्रति वस्तू दहा रुपये कमिशन मिळावे, मोफत धान्य वाटपाचे कमिशन वेळेत मिळावे, आचार आचारसंहितेचा भंग होऊ नये यासाठी साडी व बॅग वाटपाचा ऑप्शन बंद करावा आदी मागण्या बाबतचे निवेदन सातारा जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सातारा जिल्हा रास्तभाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनेमार्फत देण्यात आले. सातारा जिल्ह्यातील शासनमान्य रास्त भाव दुकानदारांच्या धान्य वाटप करतानाच्या अनेक समस्या असून गेली अनेक वर्ष या समस्यासह धान्य वाटपाचे काम सुरू आहे. मात्र विविध प्रकारच्या अडचणीमुळे रास्त



भाव दुकानदार मेटाकुटीला आले असून अनेक वेळा ग्राहकांकडून वाद होण्याचे प्रसंग घडत आहेत. त्यामुळे रास्त भाव दुकानदारांच्या पुढील समस्या घेऊन सातारा जिल्हा रास्तभाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनेमार्फत सातारा जिल्हा पुरवठा अधिकारी सौ. वैशाली राजमाने यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात करण्यात आलेल्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत, सध्या लाभार्थी कार्ड धारकांना मोफत धान्य, साड्या, मोकळ्या पिशव्या, आनंदाचा शिधा किट वाटपासाठी वेगवेगळ्या पावत्या काढाव्या लागतात. त्यामुळे पोज मशीनवर ग्राहकांचे तीन-तीन अंगठे घ्यावे लागतात. काही वेळा एक पावती निघाली तर दुसरी पावती निघत नाही. त्यामुळे एका ग्राहकांना २०-२० मिनिटे लागतात. नेटवर्क समस्या उद्भवल्यास एक ते दोन तास ग्राहकांना थांबावे लागते. या विलंबामुळे ग्राहकांची चिडचिड होऊन वादाचे प्रसंग उद्भवतात. त्यामुळे एकाच पावतीवर सर्व माल वितरित करण्याची सुविधा मिळावी, सध्या लाभार्थी कार्ड धारकांना मोफत साड्या व मोफत दहा किलो साहित्य बसेल अशी रिकामी पिशवी शासनाकडून वाटपासाठी दुकानदाराकडे आली आहे. त्या वस्तूचे वाटप सुरू आहे. या वाटपासाठी प्रति वस्तू दहा रुपये याप्रमाणे कमिशन मिळावे, दर महिना मोफत धान्य वाटपाचे कमिशन पाच तारखेपर्यंत मिळावे, आचारसंहिता लागू झाल्यापासून रिकामी पिशवी व साड्या वाटप करायच्या नाहीत असे आदेश आले आहेत. मात्र मशीनवर या वस्तूंचे ऑप्शन अद्याप सुरू असल्याने चुकून पावती निघाल्यास आचारसंहितेचा भंग होऊन शिस्तभंगाची कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी या दोन्ही वस्तूचे ऑप्शन मशीन मधून लॉक करण्यात यावेत. तसेच गोडाऊनमधून दुकानात येणारे धान्य कमी वजनाचे येते. ५० किलोच्या पोत्यामागे २५० ते ५०० ग्रॅम धान्य कमी येते. सदरचे धान्य दुकानात देताना वजन करून मिळावे. ५० किलो धान्याच्या पोत्यामागे बारदान ५०० ग्रॅम व प्लास्टिक असल्यास २०० ग्रॅम याप्रमाणे धान्याचे वजन देण्यात यावे. वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनांमध्ये काटा उपलब्ध असावा.


दरमहा धान्याचे वाटप करण्याकरिता दुकानदाराकडे त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत गोडाऊन मधून धान्य मिळावे. उशिरा धान्य आल्याने वाटपास उशीर होत असल्याने धान्य वेळेवरच मिळावे, आदी मागण्या असणारे निवेदन जिल्हा पुरवठा अधिकारी यांना देण्यात आले आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष श्रीकांत शेटे, कार्याध्यक्ष बबनराव देवरे, माण तालुका अध्यक्ष भगवानराव गोरे, वाई तालुका अधक्ष अनिल मांढरे, महाबळेश्वर तालुका अध्यक्ष अजित कासुर्डे, कराड तालुका अध्यक्ष बाळासाहेब पाटील, जावळी तालुका अध्यक्ष राजेंद्र भिलारे, कोरेगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र भोईटे, खंडाळा तालुका अध्यक्ष मधुकर पवार, पाटण तालुका अध्यक्ष बाबुराव पाटील, फलटण तालुका अध्यक्ष सिराजभाई शेख, सातारा तालुका अध्यक्ष संजय राजपूत यांच्या सह्या आहेत.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# कवठेमहांकाळ तालुक्यातील तेरा गावांचा डोंगरी भागात समावेश

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

घाटनांद्रे : खासदार संजय काका पाटील यांनी केलेल्या विशेष प्रयत्नांमुळे कवठेमहांकाळ तालुक्यातील १३ गावांचा डोंगरी भागात समावेश करण्यात आला असुन,त्यात घाटमाथ्यावरील घाटनांद्रे,कुंडलापुर,जाखापुर व वाघोली या चार गावांचा समावेश आहे.तशा आशयाचा नुकताच शासन निर्णय झाला आहे.त्यामुळे कवठेमहांकाळ तालुक्यातील या तेरा गावांना डोंगरी भागासाठी असणारे विविध फायदे मिळणार आहेत.त्यामुळे या गावामध्ये मोठे आनंदाचे वातावरण



निर्माण झाले आहे.

मागील आठवड्यातच झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या मंत्री मंडळाच्या बैठकीत डोंगरी उपविभागात राज्यातील काही गावांचा नव्याने समावेश करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.यावेळी तासगांवकवठेमहांकाळ विधानसभा मतदार संघातील गावांचा समावेश व्हावा असे खासदार संजय काका पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.याकामी युवानेते प्रभाकर (बाबा) पाटील यानीही खा संजय (काका) पाटील यांच्या मार्फत विशेष पाठपुरावा केला होता. यामध्ये कवठेमहांकाळ तालुक्याच्या घाटमाथ्यावरील घाटनांद्रे,कुंडलापूर,जाखापूर, वाघोली,रायवाडी तर कवठेमहांकाळ तालुक्याच्या पूर्व भागातील नागज परिसरातील नागज,निमज,घोरपडी, केरेवाडी,शेळकेवाडी,कदमवाडी तसेच गिरलिंग डोंगर परिसरातील कुकटोळी व दंडोबा डोंगर परिसरातील खरशिंग आदी तेरा गावांचा समावेश डोंगरी विभागात करण्यात आला आहे.

कवठेमहांकाळ तालुक्यातील या तेरा गावांतील नागरिकांना आता या योजनेमुळे डोंगरी विभागात समाविष्ट असल्याचे शासकीय दाखले मिळू शकणार आहेत.शैक्षणिक प्रवेशावेळी तसेच विविध डोंगरी योजनांचा लाभ कवठेमहांकाळ तालुक्यातील सदर तेरा गावांतील नागरिकांना आता मिळणार आहे.डोंगरी विभागात समाविष्ट करण्याचा शासन निर्णय झाल्याने सदर गावातील ग्रामस्थां मध्ये समाधानकारक प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.खासदार संजय काका पाटील व युवानेते प्रभाकर (बाबा) पाटील यांचे अभिनंदन केले जात आहे.

# नवीन शिक्षक संच मान्यता निकषांच्या परिपत्रकाला कास्ट्राईब शिक्षक संघटनेचा विरोध

## शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांना दिले निवेदन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भिलवडी : नुकताच १५ मार्च २०२४ रोजी प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी संच मान्यता मिळवण्यासाठी नवीन निकषांचे परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकाला, शासन निर्णयाला कास्ट्राईब शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्यच्या वतीने विरोध दर्शवला आहे. हा निर्णय रद्द करण्यात यावा याचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांना राज्याध्यक्ष आकाश तांबे व पदाधिकारी यांनी भेट घेऊन दिले. या परिपत्रकानुसार संच मान्यता शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ पासून अंमल बजावणी केली जाणार आहे. या निर्णयानुसार द्विशिक्षकी शाळेत तिसरा शिक्षक पात्र होण्यासाठी किमान ७६विद्यार्थी आवश्यक असणार आहेत. १ ते२० पटाच्या शाळेत दोन शिक्षक असणार मात्र एक नियमित व दुसरा सेवानिवृत्त शिक्षक, यापुढे पटसंख्या दहा किंवा त्यापेक्षा कमी असल्यास एक



शिक्षक असेल मात्र तोही सेवानिवृत्ती शिक्षकांमधून नेमणार तो उपलब्ध झाला नाही तर नियमित शिक्षक असेल, इ. ६वी ते८वी मध्ये एकच वर्ग असल्यास ३५पटा पर्यंत एक शिक्षक, ५३ पटापर्यंत दुसरा व तिसरा शिक्षक नेमण्यासाठी किमान ८८पट आवश्यक आहे.

मुख्याध्यापक पद पात्र होण्यासाठी इ. १ते५वी किंवा इ. १ते ७वी/८वी चा एकूण पट१५० असावा लागणार आहे. मात्र जुन्या शाळेत पद संरक्षित करण्यासाठी १३५पट टिकवावा लागणार आहे. यासारख्या अनेक जाचक अटी या परिपत्रकात असल्याने याची अंमलबजावणी झाल्यास अनेक शिक्षक अतिरिक्त होण्याचा, कमी पटाच्या शाळा बंद होण्याचा धोका निर्माण होण्याची भीती आहे. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्र शिक्षणापासून वंचित राहणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मोडीत काढली जाणार आहे. तसेच राज्यातील वंचित, कष्टकरी, बहुजनांना शिक्षणापासून दूर करू पाहणारे आहे. असे निवेदनात म्हटले आहे. तरी हा शासन निर्णय त्वरित रद्द करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# स्वीप मोहिमेअंतर्गत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध उपक्रमाव्दारे जनजागृती

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने जिल्ह्यात मतदार जागृतीसाठी मोहिम राबविण्यात येत असून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी स्वीपच्या (डतएएझ) माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी ७ मे २०२४ रोजी मतदान होत आहे. सात मे रोजी लोकशाहीचा उत्सव पार पडत आहे. या उत्सवामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. यासाठी स्वीप मोहिमेअंतर्गत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. जिल्ह्यातील मिरज येथील गोसावी गल्ली, उत्तम नगर, कवठेमहांकाळ येथील शाळा क्रं. १ व ३, शेटफळे हायस्कूल, न्यू इंग्लिश स्कूल-कुंभारी, जत तालुक्यातील जाडरबोदलाद येथील गजानन हायस्कूल, मौजे नागज, थबडेवाडी, निमज, खरशिंग, खानापूर तसेच आटपाडी तालुक्यातील भवानी हायस्कूल, बाबासाहेब देशमुख महाविद्यालय आदी ठिकाणी मतदान टक्का वाढावा यासाठी रांगोळी तसेच चित्रकला स्पर्धा



घेण्यात आल्या. प्रशासनाच्या या उपक्रमाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी समाधान व्यक्त केले. त्या प्रयत्नाचे फलित म्हणून जिल्ह्यात ठिकठिकाणी वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश मतदानाची टक्केवारी वाढावी असा असून या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यांमध्ये रांगोळी, चित्रकला स्पर्धा, सायकल रॅली, मतदार व महिला मेळावा त्याचबरोबर जनजागृती फेरी आदी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

# गोरक्षनाथ मठावर २५ लाख रुपये खर्चाच्या गोशाळेचे भूमिपूजन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : शिराळा येथील गोरक्षनाथ मठाच्या परिसरात एक हजार देशी गाईंचे संगोपन करणारी गोशाळा उभारली जात आहे त्याचे भूमिपूजन आज शनिवारी मठाधिपती पारसनाथ जी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सांगलीचे खासदार संजय काका पाटील ,भाजपा नेते सत्यजित भाऊ देशमुख, सौ रेणुका देवी देशमुख, मठाचे आनंदनाथ महाराज, संचालक विजय पाटील, मृणाल पाटील, प्रवीण शेटे आदी प्रमुख उपस्थित होते.



यावेळी बोलताना आनंदनाथ महाराज म्हणाले, शिराळा शाहूवाडी वाळवा तालुक्याबरोबर सांगली सातारा कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील कोणत्याही गावातून देशी गाय जर अन्न पाण्याविना तिचे हाल होत असेल तर अशा गाईंना मठावर आसरा दिला जाईल. त्यांचे तिथे योग्य ते संगोपन केले जाईल. हिंदू धर्मात गोमातेची सेवा मोठी पुण्य मानले जाते. यावेळी शिवसेनेचे संतोष हिरुगडे, स्वप्निल निकम, सत्यजित शिंदे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व्यापक प्रयत्न करणार : कमलाकांत म्हेत्रे

## नूतन शिक्षणाधिकारी यांचा सत्कार संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : सांगली जिल्ह्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व्यापक प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिकचे नूतन शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी केले. जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या वतीने प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्वागत सत्कार करण्यात आला ,याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले सांगली जिल्ह्याला खूप चांगली शैक्षणिक पार्श्वभूमी आहे . यापुढील काळात मॉडेल स्कूल, हॅपिनेस प्रोग्रॅम यासह विविध उपक्रम राबवण्यावर आपला भर असेल. प्राथमिक शाळा शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत



**सांगली जिल्हा परिषदेचे नूतन शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांचा स्वागत सत्कार करताना दीपक रोकडे, आलिशा मुलाणी, चंद्रकांत गुरव, कपिल कांबळे**

दर्जेदार कशा होतील यावर आपला भर असेल. जिल्ह्यातील प्राथमिक शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून शैक्षणिक वातावरण अधिक आकर्षक निर्माण करण्यासाठी पालक, समाज आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून आपला प्रयत्न राहील. जिल्ह्यातील उपक्रमशील प्राथमिक शिक्षकांच्याकडून विविध चांगले उपक्रम स्वीकारून, ते उपक्रम जिल्हाभर राबवण्यासाठी आपला विशेष प्रयत्न असेल. महाराष्ट्रात शैक्षणिकदृष्ट्या सांगली जिल्हा अग्रेसर कसा राहील यासाठी, व्यापक प्रयत्न करू.

यावेळी राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक दीपक रोकडे, कोकरूड- नाठवडे केंद्रप्रमुख आलिशा मुलाणी, दैनिक बंधुताचे शिराळा प्रतिनिधी चंद्रकांत गुरव, कपिल कांबळे व जिल्ह्यातील शिक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक दीपक रोकडे यांनी केले.

# क्रिकेट खेळण्याच्या कारणातून मुलास काठीने मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : शहरातील दक्षिण शिवाजीनगर येथील एका अपार्टमेंटच्या खाली क्रिकेट खेळणाऱ्या मुलाला बॉल दारात आल्याच्या कारणातून एका वृद्धाने काठीने मारहाण केल्याची घटना घडली. सदरचा प्रकार हा रविवार दि. १७ मार्च रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी फिरोज इस्माईल मुजावर (वय ४७ रा. सांगली) यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी मारहाण करणाऱ्या राजू नदाफ (वय ६०) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या मारहाणीत जुहेब मुजावर (वय १२) हा जखमी झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, फिर्यादी इस्माईल मुजावर हे आपल्या कुटुंबियांसह शहरातील दक्षिण शिवाजीनगर मधील दिग्विजय अपार्टमेंट मध्ये राहतात. त्यांचा मुलगा जखमी जुहेब मुजावर हा त्याच्या मित्रांसह अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये बॅट आणि बॉल ने खेळत होते. क्रिकेट खेळत असताना त्यांचा बॉल शेजारी राहणाऱ्या संशयित राजू नदाफ यांच्या दारात गेला. बॉल दारात आल्याच्या रागातून संशयित राजू नदाफ याने मुलगा जुहेब याला काठीने बेदम मारहाण करत जखमी केले. घडलेल्या या प्रकारानंतर जुहेब याने घडलेला सर्व प्रकार वडिलांना सांगितला. यानंतर इस्माईल मुजावर यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

# कोल्हापूर जि. प. सीईओपदाचा कार्तिकेयन एस. यांनी स्वीकारला कार्यभार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. हे पावणे दहाच्या दरम्यान जिल्हा परिषदेत आले आणि विभागप्रमुख, कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली. मावळते मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी त्यांचे स्वागत करताना केवळ सहाच विभागप्रमुख उपस्थित होते. मात्र नंतर एक एक विभागप्रमुख दाखल झाले आणि स्वागत समारंभ रंगत गेला.

पुणे स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी या पदावर कार्यरत असलेले कार्तिकेयन हे मंगळवारी दिल्लीत होते. दुपारी त्यांना बदलीचा मेसेज मिळाला. त्यानंतर ते तातडीने येण्यास निघाले. ते आज सकाळीच कार्यभार घेणार हे त्यांनी कळवले होते. त्यानुसार विभागप्रमुखांनाही कल्पना देण्यात आली होती. दहा वाजता संतोष पाटील आणि कार्तिकेयन यांना फेटा बांधण्यात आला. पाटील यांना निरोप देण्यात आला तर कार्तिकेयन यांचे स्वागत



करण्यात आले. यावेळी त्यांनी सर्व विभागप्रमुखांची ओळख करून घेतली. सर्व विभागांचे कामकाज उत्तम असून काम करण्यासाठी हा चांगला जिल्हा असल्याचे पाटील यांनी कार्तिकेयन यांना सांगितले.

# विश्वासराव नाईक साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा: चिखली (ता. शिराळा) येथील विश्वासराव नाईक सह. साखर कारखान्याच्या सन २०२३-२४ गळीत हंगामाचा सांगता समारंभ अध्यक्ष, आमदार मानसिंगराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. उपाध्यक्ष, माजी आमदार बाबासाहेब पाटील, संचालक मंडळ व कार्यकारी संचालक अमोल पाटील उपस्थितीत होते. संचालक शिवाजी पाटील यांनी स्वागत केले. संचालक सुरेश चव्हाण व सौ. सुमित्रा चव्हाण यांच्या हस्ते विधिवत पुजा संपन्न झाली. अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांच्या हस्ते साखर पोती पूजन, उत्कृष्ट काम करणारे तोडणी मजूर, वाहतूक कंत्राटदार तसेच हंगामी काम करणारे कंत्राटदार यांचा सत्कार आदी कार्यक्रम संपन्न झाले.



मनोगतात अध्यक्ष, आमदार श्री. नाईक म्हणाले, या गळीत हंगामात १२७ दिवसात कारखान्यात एकूण ५ लाख ६९ हजार ३६७ मेट्रिक टन उसाचे गाळप झाले. त्यातून ६ लाख ८६ हजार ७०० क्विंटल साखर उत्पादन झाले. सरासरी १२.०६ इतका साखर उतारा मिळाला आहे. कारखान्यात उभारलेला सहवीज निमिर्ती प्रकल्प कर्जमुक्त झाला आहे. साखर धोरण निश्चित नसल्याने साखर व्यवसाय अडचणी येत आहेत. केंद्र सरकार मार्फत किमान ५ किंवा १० वर्षे साखर धोरण निश्चित व्हायला हवे. कारखाना ऊस विकासासाठी शेती विभागामार्फत समृध्द शेतकरी अभियान राबविली जाणार आहे.

यावेळी दिनकरराव पाटील, सुरेश पाटील, विश्वास कदम, बाळासाहेब पाटील, विष्णू पाटील, डॉ. राजाराम पाटील, सुकुमार पाटील, यशवंत निकम, सुहास घोडे, संदीप तडाखे, बिरुदेव आमरे, बाबासो पाटील, यशवंत दळवी, आनंदा पाटील, अजितकुमार पाटील, तुकाराम पाटील, कामगार संचालक दत्तात्रय पाटील, कोंडिबा चौगुले तसेच कामगार संघटना अध्यक्ष टी. एम. साळुंखे, उपाध्यक्ष विजय पाटील, सरचिटणीस विजयराव देशमुख यांच्यासह सभासद, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते. विश्वास पाटील यांनी आभार मानले.

# सुनील पाटील लोकभूषण आदर्श पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आष्टा : स्वामी विवेकानंद सोशल फौंडेशन आणि सत्यशोधक महिला विचारमंच आष्टा यांच्या वतीने आज तांदुळवाडी गावचे सुपुत्र यांना जिल्हा बँकेचे संचालक वैभवदादा शिंदे व माजी राज्यमंत्री प्रा. मच्छिंद्र सकटे यांच्या हस्ते लोकभूषण आदर्श पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

आष्टा येथील हेवन हॉलमध्ये स्वामी विवेकानंद सोशल फाउंडेशनच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी चितळे दूध डेअरीचे संचालक मकरंद चितळे, जनसेवा अर्बन बँकेचे संदीप माळी, समतावादी महिला मंचच्या प्रदेशाध्यक्षा सौ. पुष्पलता सकटे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विजय दणाणे, वरदराज शिंदे, बाबासो जाधव, रंजना माळी, कविता घस्ते, सोनाली कोळी,निशा वळवडे, सुनील



**आष्टा येथील पत्रकार सुनील पाटील यांना लोकभूषण आदर्श पत्रकारकारिता पुरस्कार देताना प्रा.मच्छिंद्र सकटे,वैभवदादा शिंदे, शेजारी मकरंद चितळे,वरदराज शिंदे, विजय दणाणे,**

शिंदे, सागर जगताप यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुनील पाटील हे तांदुळवाडी गावचे रहिवासी आहेत. त्यांनी ग्रामीण भागात वाचन चळवळ रुजावी यासाठी विवेक ग्रंथालयाची स्थापना केली. ग्रंथालय चळवळ वाढवण्याबरोबर वाचन चळवळीत ही सक्रिय सहभाग घेतला. ग्रामीण भागातील विद्यार्थी विद्यार्थिनींना वाचनाची गोडी लागावी यासाठी विवेक ग्रंथालयाच्या माध्यमातून भरीव प्रयत्न केले. याचबरोबर ग्रंथालयाच्या माध्यमातून अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले.

साप्ताहिक वारणेचा वाघ मधून त्यांनी पत्रकारितेच्या प्रवासात सुरुवात केली. त्यानंतर त्यांची सन २००० साली दैनिक तरुण भारत साठी तांदुळवाडी वार्ताहर म्हणून निवड झाली. सन २००९ साली दैनिक तरुण भारत साठी आष्टा प्रतिनिधी मधून त्यांची निवड झाली. गेली चोवीस वर्षे ते पत्रकारिता क्षेत्रात आहेत. लेखणीच्या माध्यमातून त्यांनी पुष्पलता सकटे व अन्य. अनेक प्रश्न सोडवले आहेत. सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून दिला आहे. महापूर, कोरोना संसर्ग काळ या काळात त्यांनी समाज उपयोगी पत्रकारिता केली. याचबरोबर पत्रकारिता क्षेत्रात येणाऱ्या नव्या पिढीला त्यांनी नेहमीच मार्गदर्शनाची भूमिका घेतली आहे. गेल्याच आठवड्यात त्यांची महाराष्ट्र शासन नियुक्त विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड झाली आहे. त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात आजवर केलेल्या कार्याची दखल आष्टा येथील स्वामी विवेकानंद सोशल फाउंडेशनने घेतली. आणि लोकभूषण आदर्श पत्रकारिता पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. प्राध्यापक मच्छिंद्र सकटे, वैभवदादा शिंदे यांनी सुनील पाटील यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील वाटचालीचे कौतुक केले. आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा ही दिल्या. हा पुरस्कार पटकावल्याबद्दल पत्रकार सुनील पाटील यांच्यावर आष्टा शहर आणि वारणा पंचक्रोशीतून अभिनंदनचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# भाजपमधील हालचाली वाढल्या, महाडिक विमानाने मुंबईला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



कोल्हापूरः लोकसभा उमेदवार निवडीसाठीच्या भाजपमधील हालचाली वाढल्या असून खासदार धनंजय महाडिक यांना तातडीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईला बोलावून घेतले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कोल्हापूर जिल्ह्यात चर्चेला ऊत आला आहे.

येत्या २४ तासात लोकसभा उमेदवारांची घोषणा होणार आहे. त्यादृष्टिने महायुतीच्या उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. अशातच फडणवीस यांच्याकडून बुधवारी सकाळी धनंजय महाडिक यांना मुंबईला येण्याबाबत निरोप देण्यात आला. त्यामुळे सकाळच्याच विमानाने महाडिक मुंबईला रवाना झाले आहेत. महाडिक हे कोल्हापूर, हातकणंगले आणि सातारा या तीन लोकसभा मतदारसंघांचे क्लस्टरप्रमुख आहेत. त्यामुळे या तीनही जागांच्या निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये त्यांनाही स्थान देण्यात आले असून याबाबत चर्चा करण्यासाठी त्यांना तातडीने बोलावून घेण्यात आल्याचे समजते.

# राज ठाकरेंचे मनसे पदाधिकाऱ्यांना मुंबईत येण्याचे फर्मान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिल्लीतील केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीनंतर स्वपक्षाच्या पदाधिकाऱ्यांना गुरुवारी (दि. २१) मुंबईत बोलावले आहे. राज्यातील पदाधिकाऱ्यांची तिथे बैठक होणार असून, त्यात महायुतीत जाण्याच्या निर्णयावर राज ठाकरे पदाधिकाऱ्यांचे औपचारिक शिक्कामोर्तब करून घेतील, अशी चर्चा आहे.

पुण्यातून या बैठकीसाठी मनसेचे नेते राजेंद्र वागसकर, राज्य सरचिटणीस गणेश सातपुते, हेमंत संभूस, बाळा शेडगे, अजय शिंदे, किशोर शिंदे व रणजीत शिरोळे हे मुंबईला जाणार असल्याची माहिती मिळाली. फायरब्रँड नेते, मनसेचे माजी शहराध्यक्ष वसंत मोरे यांनी ही महायुती होण्याआधीच पुण्यात लोकसभा निवडणूक लढवण्यावरून पक्ष सोडला आहे. पुण्यात मनसेने लोकसभा लढवू नये, असा चुकीचा अहवाल स्थानिक नेत्यांनी राज यांना दिल्याचा त्यांचा आरोप आहे. ते आता मुंबईतील या बैठकीला नसतील, मात्र बाकी पदाधिकारी जाणार आहेत.

दरम्यान, ही बैठक होण्याआधी कोणीही महायुतीत जाण्यासंबंधी प्रसारमाध्यमांबरोबर बोलू नये, अशी लेखी




तंबी देणारे पत्र राज यांनी सर्व शहराध्यक्षांना पाठवले आहे. पुण्यातही हे पत्र मिळाले असून, त्याप्रमाणे शहराध्यक्ष साईनाथ बाबर यांनी सर्व शाखाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांना तसे कळवले आहे. याआधीच्या बहुसंख्य निवडणुकांमध्ये मनसेने सातत्याने तटस्थतेची भूमिका स्वीकारली होती. किमान या निवडणुकीत तरी मनसेने तटस्थ राहू नये, असे स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे म्हणणे होते. राजकीय पक्ष म्हणवून घ्यायचे आणि निवडणूक लढवायची नाही, अशी भूमिका या पदाधिकाऱ्यांची होती.

एका पदाधिकाऱ्याने सांगितले की, मनसेचे पुण्यात काही पॉकेट्स आहेत. वसंत मोरे बाहेर पडले. त्यानंतर त्यांचे फेसबुक लाइक्स व कमेंटची संख्या लक्षणीय घटली आहे. त्यामुळे ते गेले याचा अर्थ मनसेची मते जातील, असा नाही. राज यांना मानणारा बराच मोठा युवा वर्ग शहरात आहे. महापालिका सभागृहात मनसेचे २९ नगरसेवक होते. विधानसभा निवडणूक लढवणारे मनसेचे किशोर शिंदे यांना भाजपचे उमेदवार चंद्रकात पाटील यांच्या विरोधात ८० हजार मते मिळाली होती. त्यामुळे मनसेला कोणी स्वस्तात घेऊ नये, असे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

महापालिका निवडणूक लक्षात घेऊन मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते महायुतीत जाण्याच्या राज यांच्या निर्णयाकडे पाहतात. महापालिका निवडणुकीत ४ किंवा ३ चे पॅनल असते. महायुती पुढेही राहिली तर महापालिका निवडणुकीत या महायुतीचा चांगला फायदा होऊ शकतो, असे स्थानिक पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

# दुचाकीस्वाराला लुटणाऱ्या दोघांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली :सांगली-कर्नाळ रस्त्यावर दुचाकीवरून घरी जाणाऱ्या अडवून त्याच्यावर चाकूने हल्ला करून त्याच्याकडील मोबाईल चोरी करणाऱ्या दोघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चोरीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. सांगली ग्रामीण पोलिसांनी ही कारवाई केली. बसुराज उर्फ बश्या कल्लाप्पा अडकई (वय २६), हणमंत मल्हारी शिदे (य ३५, दोघेही रा. अहिल्यानगरझोपडपट्टी, सांगली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

कर्नाळ येथील विजय चव्हाण हे त्यांच्या दुचाकीवरून (एमएच-०९-डीई-९५५७) कर्नाळ कडे निघाले होते. रात्री साडेअकराच्या सुमारास नाल्याजवळ चौघांनी त्यांना अडवले. त्यानंतर त्यातील एकाने त्यांच्याकडील मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. तर एकाने त्यांच्यावर धारदार हत्याराने वार केला. यावेळी संशयित तेथून निघून गेले. याप्रकरणी सांगली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सांगली ग्रामीणचे पोलिस निरीक्षक राजेश रामाघरे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेला संशयितांना पकडण्याच्या सूचना दिल्या होत्या. पथक त्यांचा शोध घेत असताना दोघेजण माधवनगर येथे चोरीचा मोबाईल विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली. पथकाने सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याजवळ मोबाईल सापडला. त्याबाबत चौकशी केल्यानंतर त्यांनी दुचाकीस्वाराकडून तो जबरदस्तीने काढून घेतल्याची कबुली दिली. मोबाईल जप्त करून दोघांनाही अटक करण्यात आली. दोघांनाही दि. २१ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

सांगली ग्रामीणचे पोलिस निरीक्षक राजेश रामाघरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक मनोज पाटील, प्रियांका बाबर, मेघराज रूपनर, महेश जाधव, बंडू पवार, अमोल क्षीरसागर आदींच्या पथकाने कारवाई केली.




सांगली : दुचाकीस्वाराला लुटणारा चोरटा, जप्त करण्यात आलेला मुद्देमाल व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी

# निवडणूक अनुषंगाने एक खिडकीच्या माध्यमातून मिळणार परवाने

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कामांकरिता विविध राजकीय पक्ष व उमेदवार यांना आचारसंहिता कालावधीत द्यावयाच्या विविध परवानग्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यास्तरावर आजपासून एक खिडकी कक्ष सुरू करण्यात आला आहे. सांगली लोकसभा मतदार संघासाठी सदरचा कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सांगली (तळमजला) येथे कार्यरत करण्यात आला आहे. तर त्या त्या तालुक्याच्या ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर ही एक खिडकी कक्षामधून परवाने देण्यात येतील. एकापेक्षा अधिक विधानसभा मतदार संघाकरिता वाहन परवाना, रॅली, मिरवणूक परवाना आदी बाबींचा यामध्ये समावेश राहणार आहे. सुविधा पोर्टलवर तसेच प्रत्यक्ष प्राप्त होणाऱ्या अर्जाबाबत एपलीश पोर्टलच्या माध्यमातून परवानगी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

जिल्ह्यातील २८१-मिरज विधानसभा मतदार संघासाठी - पंचायत समिती मिरज, २८२-सांगली - सांगली महानगरपालिका, २८५ पलूस -कडेगाव - उपविभागीय कार्यालय कडेगाव, २८६-खानापूर - तहसिल कार्यालय विटा, २८७ - तासगाव - कवठे महांकाळ - प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय तासगाव व २८८-जत विधानसभा मतदारसंघासाठी नवीन प्रशासकीय इमारत तहसील कार्यालय जत या ठिकाणी एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये इस्लामपूर व शिराळा विधानसभा मतदार संघाचा समावेश नाही.

जाहीर /कॉर्नर सभा, मेळावे, मिरवणुका, रोड - शो, रॅलीज, वाहन परवाना इत्यादींच्या अनुषंगाने संबंधित राजकीय पक्षाच्या लेटर हेडवर त्या संबंधित राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा अर्ज व उमेदवार यांच्या बाबतीत उमेदवाराच्या स्वतःच्या सहीचा अर्ज किंवा उमेदवाराचा अधिकृत निवडणूक प्रतिनिधीच्या सहीचा अर्ज सदर कक्षामध्ये स. १० ते सायं ५ या वेळेत सुट्टीच्या दिवशीही स्विकारण्यात येतील. मीटिंग, सभा, रॅली आदीच्या परवानगीसाठी किमान २ दिवस अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच suvidha.gov.eci.in या पब्लिक पोर्टलवर ही अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असून विविध परवानगी देण्याच्या अनुषंगाने अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे, फी आदीबाबत सविस्तर माहिती sangli.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# १२ वर्षांनी अच्छे दिन; राजापुरी हळदीला सोन्याचा भाव, क्विंटलला ६१ हजार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीला हंगामात सोन्याचा भाव मिळताना दिसत आहे. बुधवारी निघालेल्या हळदीच्या सौद्यात राजापुरी हळदीस ऐतिहासिक ६१ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला आहे. बाजार समिती स्थापन झाल्यापासूनचा हा ऐतिहासिक दर राहिला आहे. आवक कमी असल्यामुळे हळदीला सरासरी १८ ते २५ हजारांपर्यंत दर मिळाला आहे. दर तेजीत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

सांगली मार्केट यार्डात बुधवारी एन. बी. पाटील-शिरगावकर यांच्या अडत दुकानामध्ये अरिहंत बाबू गुळण्णावर (रा. यरगट्टी) व बसाप्पा पराप्पा कोकटनुर (रा. यरगट्टी) या शेतकऱ्यांनी हळदी विक्रीसाठी आणली होती. या हळदीस सौद्यामध्ये उच्चांकी ६१ हजार रुपयांचा दर देऊन मनाली ट्रेडिंग कंपनी यांनी खरेदी केली. सध्या हळद या शेतीमालास उच्चांकी भाव मिळत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती सुजय शिंदे, सभापती, सचिव महेश चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये सौदे निघाले. यावेळी मनोहर सारडा, कौशल शहा, संदीप मालू, विवेक शहा, बाळू मर्दा, भरत अटल, अविनाश अटल, राजेश पटेल आदी व्यापारी उपस्थित होते.

२०१०-११ यावर्षी हळदीला प्रतिक्विंटल ३२ हजार रुपयांचा उच्चांकी दर मिळाला होता. यावेळी सरासरी दरही १५ ते २० हजार रुपये क्विंटल दर होता पण, त्यानंतर हळदीचे दर खूपच कमी झाले. गेल्यावर्षी तर प्रति क्विंटल सहा ते नऊ हजार रुपये दर होता. यामुळे हळद लागण कमी झाली. म्हणूनच सद्या हळदीचे दर वाढले आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येन हळद विक्रीसाठी सांगली मार्केट यार्डात आणावी, असे आवाहन एन. बी. पाटील-शिरगावकर आडत दुकानदार नितीन पाटील यांनी केले.

# धनंजय मुंडेंचा खास माणूस फुटला; बजरंग सोनवणेंचा शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई - राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्या उपस्थितीत बजरंगण सोनवणे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. त्यामुळे, बीड जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का मानला जात आहे. राष्ट्रवादीतील नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय म्हणून बजरंग सोनवणे यांच्याकडे पाहिले जाते. मात्र, त्यांनी धनंजय मुंडेंची साथ सोडून शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर, या प्रवेशामुळे त्यांची पुन्हा एकदा बीडमधील लोकसभेची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. गतपंचावार्षिक निवडणुकीतही त्यांनी प्रीतम मुंडेविरुद्ध राष्ट्रवादीकडून निवडणूल लढवली होती.

लोकसभा निवडणुकीपूर्वी राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भाजपने बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे अजित पवार गटातील बजरंग सोनावणे हेही उमेदवारीसाठी इच्छूक होते. त्याच पार्श्वभूमीवर बजरंग सोनवणे यांनी आज बीडमधील त्यांच्या कार्यकर्त्यांसह शरद पवारांच्या



राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. यावेळी, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व आमदार संदीप क्षीरसागर हेही उपस्थित होते. दरम्यान, या प्रवेशामुळे आता अजित पवार गटाला निलेश लंके यांच्यानंतर आणखी एक धक्का बसणार असल्याचे बोलले जात आहे. शरद पवार गटाकडून बजरंग सोनावणे यांना बीड लोकसभेची उमेदवारी दिल्यास पंकजा मुंडे यांची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा सुरू आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनावणे हे उमेदवारीसाठी इच्छूक आहेत. गेल्या काही दिवसापासून सोनावणे यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी असा आग्रह कार्यकर्त्यांनी केला आहे. दरम्यान, शरद पवार यांनी बीड लोकसभा मतदार संघाची बैठक बोलावली. या बैठकीपूर्वीच बजरंग सोनावणे यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला असून शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून ते पंकजा मुंडेंविरुद्ध निवडणुकीच्या मैदानात उतरतील, असे दिसून येते. दरम्यान, बजरंग सोनवणे यांनी ट्विट करुन अजित पवार यांच्या पक्षातील सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

# कोथरूड परिसरातील फ्लॅटवर भरदिवसा डल्ला, सात तोळे सोने लंपास

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे :कोथरूड शास्त्रीनगर येथील विवेकानंद कॉलनीतील एका सदनिकेवर चोरट्यांनी डल्ला मारला. साडेतीन लाख रुपये किमतीचे सात तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरट्यांनी लंपास केले. ही घटना १५ ते १७ मार्च या कालावधीत घडली आहे. याप्रकरणी ५० वर्षीय महिलेने कोथरूडपोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोराविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.



विवेकानंद कॉलनी, शास्त्रीनगर येथील भास्कर बिल्डिंगमध्ये फिर्यादी यांची सदनिका आहे. दरम्यानच्या काळात त्यांची सदनिका बंद असताना, चोरट्यांनी दरवाजाचा कडी-कोयंडा उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर सोन्याचा ऐवज चोरी करून पळ काढला. पोलिस उपनिरीक्षक माळी पुढील तपास करत आहेत.

सिद्धी रेसिडेन्सी पेरणे फाटा येथील दीपक वाकचौरे (वय २६) यांच्या बंद सदनिकेत चोरट्यांनी चोरी करून सोन्याचे दागिने, मोबाइल असा ४७ हजार ८०० रुपयांचा ऐवज चोरीला गेला. याप्रकरणी वाकचौरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, लोणीकंद पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. १९ मार्च रोजी भरदिवसा ही चोरीची घटना झाली.

# बोगस न्यूटन इंटरप्राईजेस कंपनीला काळया यादीत घाला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : न्यूटन एंटरप्राईजेस या बोगस कंपनीच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची औषधे खरेदी झाल्याचे सिध्द झाले आहे. या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करुन संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याच्या त्याचबरोबर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याच्या सूचना असतानाही अद्याप संबंधित ठेकेदारावर फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्याचे कारण स्पष्ट करावे, अन्यथा न्यायालयात अपील करावे लागेल असा इशारा मंगळवारी शिवसेनेच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सीपीआरच्या अधिष्ठाता डॉ. एस. एस.मोरे यांना दिला. सीपीआरमध्ये शिवसेनेच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांनी मंगळवारी सीपीआरच्या अधिष्ठातांची भेट घेतली.

न्यूटन इंटरप्राईजेस कंपनीचा परवाना बनावट असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने लेखी स्वरुपाच्या



सूचना दिल्या, तरी प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्याने आणि कर्मचाऱ्यांच्या साखळीमुळे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने संबंधित ठेकेदाराला काम देऊ नये असा अभिप्राय दिला असतानाही कोट्यवधी रुपयांची औषधे खरेदी केली. शिवसेनेने या विषयावर हल्लाबोल केल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करुन संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याच्या सूचना केल्या, त्याचबरोबर गुन्हा दाखल करण्याच्याही सूचना असताना अद्यापपर्यंत संबंधित ठेकेदारावर फसवणुकीचा गुन्हा दाखल का केला नाही असा सवाल शिवसेनेने केला.

दहा कोटी रुपयांची गरजेनुसार खरेदी न करता अनावश्यक, मोठ्या प्रमाणात टक्केवारी मिळते म्हणून नाविन्यपूर्ण योजनेतून खरेदी करणाऱ्या प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी व त्यांना साथ देणाऱ्या यंत्रणेचा बुरखा फाडून संबंधित खात्याचे मंत्री पालकमंत्री हसन मुश्रीफ यानी बंदोबस्त करावा अशी मागणी या पक्षाने केली आहे. यावेळी शिवसेना उपनेते संजय पवार, विजय देवणे, विशाल देवकुळे, दिनेश साळोखे, विराज ओतारी, महादेव कुकडे, सूरज कांबळे, संजय जाधव, हर्षल पाटील, अभिजीत बुकशेठ, प्रवीण पालव, माधुरी जाधव, सुनील कानूरकर उपस्थित होते.

# कन्या महाविद्यालयाच्या ४ विद्यार्थिनींना बॅरि.पी.जी.पाटील गुणवत्ता शिष्यवृत्ती

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मिरजः प्रतिवर्षीप्रमाणे बॅरि. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई प्रतिष्ठान, सातारा यांच्यामार्फत देण्यात येणारी बॅरि. पी. जी. पाटील गुणवत्ता शिष्यवृत्ती मिरजेतील कन्या महाविद्यालयाच्या कु. निलम विजय यादव - बी.ए. २, कु.निकिता सुभाष पाटील - एम.ए. २, नेहा सुभाष पाटील - एम.ए. २, कु. मानसी महावीर आरगे- एम.ए. १ या चार विद्यार्थीनींना प्राप्त झाली.



शिष्यवृत्ती म्हणून मिळालेली प्रत्येकी २००० रुपये रक्कम दि न्यू मिरज एज्युकेशन सोसायटीचे सचिव राजू झाडबुके यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रदान करण्यात आली. गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणास हातभार लागावा, त्यांच्यात उच्च दर्जाची गुणवत्ता निर्माण व्हावी या हेतूने ही गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते. या विद्यार्थीनींना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, शिष्यवृत्ती विभागाचे प्रा. रमेश कट्टीमणी, प्रा. मानसी शिरगावकर यांचे मार्गदर्शन लाभले. कर्मयोगी बॅरिस्टर पी.जी. पाटील यांचे नावे दिली जाणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशप्राप्त विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.